# - व्यवस्थापन परिषद सभेचा कार्यवृत्तांत -

सोलापूर विद्यापीठाच्या **व्यवस्थापन परिषदेची सभा बुधवार दि.२४/१२/०८ रोजी दुपारी १-०० वा.** व्यवस्थापन परिषद सभागृहात झाली. या सभेस खालीलप्रमाणे सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १) | मा. प्रा. डॉ. बी. पी. बंडगर - अध्यक्ष. | अध्यक्ष |
| २) | मा. डॉ. बाबासाहेब कदम, शिक्षण सहसंचालक कोल्हापूर विभाग<br>(मा. शिक्षण संचालक उ.शि. पुणे यांचे प्रतिनिधी) | सदस्य |
| ३) | मा. डॉ. एल. पी. देशमुख | सदस्य |
| ४) | मा. प्राचार्य डॉ. आर. एन. शेंडगे, संचालक म. व वि. वि. मं. | सदस्य |
| ५) | मा. प्राचार्य श्री. जे. के. बिले | सदस्य |
| ६) | मा. प्रा. श्री. पी. एम. हिरेमठ | सदस्य |
| ७) | मा. प्राचार्य डॉ. सी. बी. कोळेकर | सदस्या |
| ८) | मा. प्रा. श्री. एन. बी. पवार | सदस्य |
| ९) | मा. श्रीमती एन. व्ही. साठे | सदस्या |
| १०) | मा. प्रा. श्री. बी. पी. रोंगे | सदस्य |
| ११) | मा. डॉ. पी. जी. मोरे | सदस्य |
| १२) | मा. डॉ. पी. बी. जोशी,<br>प्रभारी वित्त व लेखा अधिकारी (स्थायी निमंत्रित) | स्थायी निमंत्रित |
| १३) | मा. डॉ. एम. एस. शेजूळ,<br>प्रभारी परीक्षा नियंत्रक (स्थायी निमंत्रित) तथा कुलसचिव (सदस्य सचिव) | स्थायी निमंत्रित<br>तथा सचिव |

सभेच्या सुरुवातीला मा.कुलसचिव यांनी मा.कुलगुरु आणि सर्व सन्माननीय सदस्यांचे स्वागत केले.

दि.२६/११/२००८ रोजी मुंबई येथे झालेल्या अतिरेकी हल्ल्यामध्ये शहीद झालेले श्री. अशोक कामटे, श्री. विजय साळस्कर, श्री. हेमंत करकरे, इतर पोलिस अधिकारी आणि कर्मचारी तसेच हल्ल्यात बळी पडलेले निरपराध नागरीक यांना श्रध्दांजली वाहण्यात आली. सांगोला महाविद्यालय सांगोला येथील अधिव्याख्याता प्रा.भुसे यांचे अपघाती निधन झाले. त्यांना श्रध्दांजली वाहण्यात आली.

व्यवस्थापन परिषेदेचे माजी सदस्य प्रा. व्ही. तिरुपती, डॉ. आर. आर. पाटील आणि डॉ. श्रीमती व्ही. जे. नाईकनवरे यांचा शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन मा.कुलगुरु यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

व्यवस्थापन परिषद सदस्यांनी त्यांच्या कालावधीत केलेल्या कार्याचा गौरव करण्याचे नव्याने सुरु केलेला उपक्रम स्तुत्य असल्याचे प्राचार्य श्री. जे. के. बिले यांनी सांगितले.

व्यवस्थापन परिषदेच्या या सभेस उपस्थित राहू शकत नसल्याचे मा. श्री. जयसिंह मोहिते-पाटील यांनी पत्राद्वारे आणि ॲड.रामदास सब्बन यांनी दूरध्वनीद्वारे कळविले. याची व्यवस्थापन परिषदेने नोंद घेतली.

जे ठराव मा.कुलगुरुंनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने घेतलेल्या निर्णयाशी संबंधित असतील (ठराव नोंद घेण्यात आली) अशा ठरावावरील कार्यवाही ही ---- अशी दाखवावी असे ठरले.

कार्यवाही अहवालातील ठराव क्र. ६ मध्ये क्र. ६ मध्ये श्रीमती एस. एस. पटवर्धन ऐवजी श्री. एस. एस. पटवर्धन अशी दुरुस्ती.

**विषय क्र. १** **दि.१८ ऑक्टोबर २००८ रोजीच्या पुढे ढकलण्यात आलेल्या व्यवस्थापन परिषदेच्या दि.०७ नोव्हेंबर, २००८ रोजी झालेल्या सभेचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणे.**

**ठराव क्र.१** **दि.१८ ऑक्टोबर २००८ रोजीच्या पुढे ढकलण्यात आलेल्या व्यवस्थापन परिषदेच्या दि.०७ नोव्हेंबर, २००८ रोजी झालेल्या सभेचा कार्यवृत्तांत खालील दुरुस्त्यांसह वाचून कायम करण्यात आला.**
**१) प्रा. व्ही. तिरुपती, डॉ. श्रीमती व्ही. जे. नाईकनवरे, डॉ. आर. आर. पाटील यांना विद्यापीठाचे बोधचिन्ह देऊन यशोचित सत्कार करावा.**
**२) पान क्र. ६ वर, ठराव क्र. ६ मधील, क्र. ६ मध्ये श्रीमती एस. एस. पटवर्धन ऐवजी श्री. एस. एस. पटवर्धन अशी दुरुस्ती करावी.**

**विषय क्र. २** **४थ्या दीक्षांत समारंभात पदवी, पदविका, प्रमाणपत्रे प्रदान करण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

(टिपणी: महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ अंतर्गत कलम ९६(१) नुसार पदव्या, पदविका प्रमाणपत्रे प्रदान करण्याबाबत खालीलप्रमाणे तरतूद आहे.
"The Management Council may institute and confer such Degrees, Diplomas, Certificates and other academic distinctions as may be recommended by the Academic Council."
या तरतूदीनुसार विद्यापरिषदेने व्यवस्थापन परिषदेस अशा पदव्या, पदविका प्रमाणपत्रे देण्याबाबत शिफारस करावयाची असते. जे स्नातक पदव्या, पदविका प्रमाणपत्रे घेऊ इच्छितात अशा स्नातकांची यादी नस्तीवर आहे. दि.११/१२/२००८ रोजी विद्यापरिषदेच्या झालेल्या सभेत विषय क्र.३७ वरील झालेला ठराव खालीलप्रमाणे आहे.

ठराव :- **"१) विधी विद्याशाखेतील एल.एल.बी., एल.एल.एम. या पदव्या प्रदान करण्याची व विषयपटलावरील इतर पदव्या, पदविका प्रमाणपत्रे प्रदान करण्याची विद्यापरिषदेने व्यवस्थापन परिषदेस शिफारस केली.**
**२) ५ वर्षाचा विधी अभ्यासक्रम करणाऱ्या विद्यार्थ्यांना B.S.L. पदवी तीन वर्षे पूर्ण झाल्यानंतर देण्याची बाब विद्यापरिषेदच्या विचारार्थ होती. तथापि, सदर पदवी UGC मान्य पदव्यांच्या यादीमध्ये नसल्याने विद्यापरिषदेने ही पदवी प्रदान न करण्याबाबत व्यवस्थापन परिषदेस शिफारस केली आहे.**

सबब, व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.)

**ठराव क्र.२** **विधी विद्याशाखेतील पात्र स्नातकांना एल.एल.बी. आणि एल.एल.एम. पदवी प्रमाणपत्रे प्रदान करण्याबाबत तसेच विद्यापरिषदेच्या दि.११/१२/२००८ रोजीच्या सभेतील विषय क्र.३७ नुसार विषयपटलावरील बी.एस.एल., बी.सी.एस. पदव्या वगळून इतर पात्र स्नातकांना पदव्या/पदविका प्रमाणपत्रे प्रदान करण्याबाबत विद्यापरिषदेने केलेली शिफारस मान्य करण्यात आली.**

**विषय क्र. ३** **M.A.(Education) ही पदवी स्थापित करण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

टिपणी:- Education अभ्यासमंडळाच्या दिनांक १०/११/२००८ च्या बैठकीत ठराव क्रमांक २ नुसार M.A.(Education) चा अभ्यासक्रम स्वीकारण्यात आलेला असून विद्यापीठ अधिकार मंडळास जून २००९ पासून अंमलबजावणी करण्यासाठी शिफारस केलेला होता.

शिक्षणशास्त्र विद्याशाखा अधिष्ठाता यांनी विद्याशाखेच्यावतीने दि.१०/११/२००८ रोजी M.A.(Education) चा अभ्यासक्रम शिफारस केलेला होता.

याबाबतचा विषय विद्यापरिषदेच्या दि.११/१२/२००८ रोजीच्या सभेत विषय क्र. ११ अन्वये सादर करण्यात आला होता. विद्यापरिषदेने M.A. (Education) ही पदवी स्थापित करण्याची व्यवस्थापन परिषदेस केलेली शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.

**ठराव क्र.३** **M.A.(Education) ही पदवी स्थापित करण्याबाबत विद्यापरिषदेने केलेली शिफारस मान्य करण्यात आली.**

**विषय क्र. ४** **सोलापूर विद्यापीठामध्ये LL.B. (General) ऐवजी B.G.L.(Bachelor of General Law) ही पदवी स्थापन करण्याची आणि प्रदान करण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

टिपणी: जे विद्यार्थी ३ वर्षाच्या LL.B. पदवीसाठी प्रवेश घेतात अशा विद्यार्थ्यांना या पूर्वी दोन वर्षानंतर LL.B. (General) अशी पदवी दिली जात होती. तथापि UGC Section २२ (E) मध्ये LL.B. (General) या पदवीचा उल्लेख नाही. या पदवीशी समकक्ष असणारी B.G.L.(Bachelor of General Law) ही पदवी UGC च्या यादीत आहे. सदर पदवी स्थापन करण्याबाबत विषय विद्यापरिषदेच्या दि.११/१२/२००८ रोजीच्या सभेत आयत्या वेळेचा विषय क्र. ४०(१२) अन्वये सादर करण्यात आला होता. विद्यापरिषदेने सोलापूर विद्यापीठामध्ये B.G.L.(Bachelor of General Law) ही पदवी स्थापन करण्याची आणि प्रदान करण्याची व्यवस्थापन परिषदेस केलेली शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.

**ठराव क्र.४ LL.B. (General) ऐवजी B.G.L.(Bachelor of General Law) ही पदवी स्थापन करण्याची आणि प्रदान करण्याची विद्यापरिषदेने केलेली शिफारस मान्य करण्यात आली.**

**विषय क्र. ५ Bachelor of Computer Science (B.C.S.) ऐवजी B.Sc. (Entire Computer Science) नावातील बदल व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

टिपणी: महाराष्ट्र शासन परिपत्रक क्रमांक - एनजीसी २००७/(३४८/०७)/मशि-३, दि.२२ फेब्रुवारी, २००८ विद्यापीठ अनुदान आयोग अधिनियम - २२ खाली प्रस्तुत केलेल्या अभ्यासक्रमाच्या पदव्यांतीलच पदव्या देणे बंधनकारक आहे.

दि.१६/०२/२००८ च्या अभ्यासमंडळाच्या बैठकीत विज्ञान शाखाअंतर्गत चालणाऱ्या Bachelor of Computer Science या अभ्यासक्रमास B.Sc. (Enitre Computer Science) असे नाव देण्याची शिफारस केलेली होती.

सदर नावातील बदलाबाबत विषय विद्यापरिषदेच्या दि.११/१२/२००८ रोजीच्या सभेत विषय क्र.८ अन्वये ठेवण्यात आला होता. विद्यापरिषदेने Bachelor of Computer Science ऐवजी B.Sc. (Entire Computer Science) नावातील बदलाची व्यवस्थापन परिषदेस केलेली शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.

**ठराव क्र.५ विज्ञान विद्याशाखातंर्गत चालणाऱ्या Bachelor of Computer Science (B.C.S.) या अभ्यासक्रमास B.Sc. (Entire Computer Science) असे नाव देण्याची आणि पात्र स्नातकांना ही पदवी देण्याची विद्यापरिषदेने केलेली शिफारस मान्य करण्यात आली.**

**विषय क्र. ६ Psychology या विषयाच्या पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या पदवी प्रमाणपत्रावर Clinical Psychology असे Specialisation नमूद करण्याबाबत विद्यापरिषदेने केलेली शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

टिपणी: सामाजिक शास्त्रे विद्याशाखा अधिष्ठाता यांनी दिनांक १६/०६/२००८ च्या बैठकीत पदव्युत्तर प्रमाणपत्रावर Clinical Psychology Specialisation असा निर्देश स्वीकारुन शिफारस केलेली होती. याबाबत विषय विद्यापरिषदेच्या दि.११/१२/२००८ रोजीच्या सभेत विषय क्र. १३ अन्वये सादर करण्यात आला होता. विद्यापरिषदेने Psychology या विषयाच्या पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या पदवी प्रमाणपत्रावर Clinical Psychology असे Specialisation नमूद करण्याबाबत व्यवस्थापन परिषदेस केलेली शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.

**ठराव क्र.६ विद्यापरिषदेने Psychology या विषयाच्या पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या पदवी प्रमाणपत्रावर Clinical Psychology असे Specialisation नमूद करण्याबाबत केलेली शिफारस मान्य करण्यात आली.**

**विषय क्र. ७ महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ७९ (१) (a) अन्वये गठीत केलेल्या, वित्त व लेखाधिकारी या पदासाठी निवड समितीने केलेल्या शिफारशी मा.व्यवस्थापन परिषदेस स्नेहदराने अग्रेषित.**

या विद्यापीठातील वित्त व लेखाधिकारी हे पद भरण्यासाठी विविध वर्तमानपत्रात व विद्यापीठाच्या संकेतस्थळावर जाहिरात क्र.SUS/ESTT/STP-२१/२००८ दिनांक २५ सप्टेंबर, २००८ अन्वये प्रसिध्द करुन अर्ज मागविण्यात आले होते. सदर जाहिरातीस अनुसरुन प्राप्त अर्जांची छाननी करुन, महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ कलम ७९ (१) (a) अन्वये गठीत केलेल्या निवड समितीची बैठक दिनांक १३-१२-२००८ रोजी आयोजित करण्यात आली होती. उक्त निवड समितीने उमेदवारांच्या मुलाखती घेवून निवड झालेल्या उमेदवारांच्या नावांची शिफारस गोपनीयरित्या केलेली असून सदरील शिफारस मोहरबंद लिफाफ्यासह सादर करण्यात येत आहे.

सबब, महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ कलम ७९ (१) (a) अन्वये गठीत केलेल्या वित्त व लेखाधिकारी या पदासाठी निवड समितीच्या शिफारशी महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ कलम २० (१) (b) अन्वये मा.व्यवस्थापन परिषदेच्या निर्णयास्तव सादर.

**ठराव क्र.७ महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ७९ (१) (a) अन्वये गठीत केलेल्या, वित्त व लेखाधिकारी या पदासाठी निवड समितीने डॉ. डी. डी. पुजारी यांची केलेली शिफारस मान्य करण्यात आली.**

**विषय क्र. ८ नवीन अंदाजपत्रकीय शिर्षक उघडण्याबाबत मा.कुलगुरुमहोदय यांनी केलेली कार्यवाही व्यवस्थापन परिषदेस माहितीसाठी..**

टिपणी: मा.सचिव, महामहिम राज्यपाल भवन यांचे कार्यालयाकडून प्राप्त पत्रानुसार मुंबई येथे दि.२६ ते २९ नोव्हेंबर, २००८ दरम्यान झालेल्या अतिरेकी हल्ल्यात अनेकांना प्राण गमवावे लागले असून यामध्ये अतिरेक्यांशी लढताना अनेक जवान शहीद झाले आहेत त्यांना श्रध्दांजली अर्पण करणे व त्यांनी केलेल्या शौर्याबद्दल त्यांचा गौरव करण्याच्या दृष्टीने शनिवार दि. २० डिसेंबर, २००८ रोजी सायंकाळी ५-०० वाजता सर्व विद्यापीठाच्या वतीने शिवाजी पार्क, मुंबई येथे हजारो विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत सदरचा कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला आहे. या कार्यक्रमाच्या खर्चासाठी रु.५०,०००/- चा डी. डी. F & A O University of Mumbai या नावाने पाठविण्याचे सांगण्यात आलेले आहे.

त्यानुसार मा.कुलगुरुमहोदय यांच्या कार्यालयाकडील टिपणीवरील आदेशानुसार तो पाठविण्यात आलेला आहे. परंतु सदरचा खर्च खर्ची टाकण्यासाठी सन २००८-०९ च्या अंदाजपत्रकात खालीलप्रमाणे नवीन अंदाजपत्रकीय शिर्षक उघडणे आवश्यक आहे. त्यास मा.कुलगुरुमहोदय यांनी मान्यता दिलेली असून सदरची बाब व्यवस्थापन परिषदेस माहितीसाठी सादर.

| Maintenance Budget | | | |
|---|---|---|---|
| Department ३ Registrar | | | |
| Receipt Side | | Expenditure Side | |
| Budget | Provision | Budget | Provision |
| Apatkalin Nidhi | ५,००,०००/- | Apatkalin Nidhi Expenses | ५०,०००/- |

**ठराव क्र.८** **नवीन अंदाजपत्रकीय शिर्षक उघडण्याबाबत मा.कुलगुरुमहोदय यांनी केलेली कार्यवाहीची व्यवस्थापन परिषदेने नोंद घेतली.**

**विषय क्र. ९** **संगणक विभागाकडील अंदाजपत्रकीय तरतुदीचे पुनर्नियोजनाची बाब व्यवस्थापन परिषदेच्या माहितीसाठी.**

टिपणी: मा. विभागप्रमुख, संगणकशास्त्र विभाग यांनी पत्र क्र. SUS/DCS/६१९ दि.१३/१२/२००८ अन्वये विभागाकडील सन २००८-२००९ या आर्थिक वर्षासाठी करण्यात आलेल्या अंदाजपत्रकीय तरतुदीचे पुनर्नियोजन करुन मिळण्याबाबतचा प्रस्ताव सादर केला होता. त्यानुसार मा.कुलगुरुमहोदय यांनी खालीलप्रमाणे अंदाजपत्रकीय तरतुदीचे पुनर्नियोजनास मान्यता दिलेली आहे.

For the year 2008-2009

| Sr. No. | Name of the Budget Head | Original Provision | Re-revised Provision |
|---|---|---|---|
| 1) | Salary to Teaching Staff | 11,04,000/-<br>(-) 1,00,000/-<br>10,04,000/- | 10,04,000/- |
| 2) | Hon. To Contributory Staff | 1,00,000/-<br>(+) 1,00,000/-<br>2,00,000/- | 2,00,000/- |

**ठराव क्र.९** **संगणक विभागाकडील अंदाजपत्रकीय तरतुदीचे पुनर्नियोजनाबाबत मा.कुलगुरुमहोदयांनी केलेल्या कार्यवाहीची व्यवस्थापन परिषदेने नोंद घेतली.**

**विषय क्र. १०** **कार्यालयाकडील अंदाजपत्रकीय तरतुदीचे पुनर्नियोजनाची बाब व्यवस्थापन परिषदेच्या माहितीसाठी.**

टिपणी: आस्थापना विभागाच्या दि.०६/१२/२००८ टिपणीनुसार शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या जादा कामाचे देयक अदा करण्यासाठी अंदाजपत्रकीय तरतुद संपल्याने सन २००८-२००९ या आर्थिक वर्षासाठी करण्यात आलेल्या अंदाजपत्रकीय तरतुदीचे पुनर्नियोजन करुन मिळण्याबाबतचा प्रस्ताव सादर केला होता, त्यानुसार मा.कुलगुरुमहोदय यांनी खालीलप्रमाणे अंदाजपत्रकीय तरतुदीचे पुनर्नियोजनास मान्यता दिलेली आहे.

For the year 2008-2009

| Sr. No. | Name of the Budget Head | Original Provision | Re-revised Provision |
|---|---|---|---|
| 1) | Maintenance Budget<br>Registrar Office<br>Overtime to N.T. Staff | 1,00,000/-<br>(+) 90,000/-<br>1,90,000/- | 1,90,000/- |
| 2) | Maintenance Budget<br>Registrar Office<br>Seminar / Workshop | 2,00,000/-<br>(-) 25,000/-<br>1,75,000/- | 1,75,000/- |
| 3) | Maintenance Budget<br>Registrar Office<br>Orientation Programme for Adm. Staff | 50,000/-<br>(-) 45,000/-<br>5,000/- | 5,000/- |
| 4) | Maintenance Budget<br>Registrar Office<br>University Contribution to Employees Welfare Fund | 25,000/-<br>(-) 20,000/-<br>5,000/- | 5,000/- |

**ठराव क्र.१०** **कार्यालयाकडील अंदाजपत्रकीय तरतुदीचे पुनर्नियोजनाबाबत मा.कुलगुरुमहोदयांनी केलेल्या कार्यवाहीची व्यवस्थापन परिषदेने नोंद घेतली.**

**विषय क्र. ११** **नेताजी सुभाषचंद्र बोस शारिरीक शिक्षण महाविद्यालय, अकलूज हे जून २००५-०६ पासून पूर्वलक्षीप्रभावाने बंद करण्याबाबतची बाब विचारार्थ सादर.**

(सोबत समितीच्या अहवालाची प्रत जोडली आहे)

टिपणी: नेताजी सुभाषचंद्र बोस शारिरीक शिक्षण महाविद्यालय, अकलूज या महाविद्यालयास विद्यार्थी मिळत नसल्याने बंद करण्याबाबत संस्थेकडून प्रस्ताव आलेला होता. याबाबत महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ समितीच्या वतीने स्थानिक चौकशी समिती पाठविलेली होती.

समितीचा अहवाल सोबत जोडलेला असून समितीने शैक्षणिक वर्ष २००५-०६

पासून महाविद्यालय पूर्वलक्षी प्रभावाने बंद करण्याबाबतची शिफारस केलेली आहे.

महाविद्यालय बंद करण्याबाबत विषय विद्यापरिषदेच्या दि.११/१२/२००८ रोजीच्या सभेत विषय क्र. १६ अन्वये सादर करण्यात आला होता. याबाबत विद्यापरिषदेने सदर महाविद्यालय हे जून २००५-०६ पासून पूर्वलक्षीप्रभावाने बंद करण्यास व्यवस्थापन परिषदेस शिफारस केलेली आहे. सबब सदर शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर.

**ठराव क्र.११** **नेताजी सुभाषचंद्र बोस शारिरीक शिक्षण महाविद्यालय, अकलूज हे जून २००५-०६ पासून पूर्वलक्षीप्रभावाने बंद करण्याची विद्यापरिषदेने केलेली शिफारस मान्य करण्यात आली.**

**विषय क्र. १२** **वास्तुविशारद श्री. यादगिरी कोंडा यांचे देयक व्यवस्थापन परिषदेच्या अवलोकनार्थ.**

टिपणी:- श्री. यादगिरी कोंडा सोलापूर विद्यापीठाच्या काही इमारतींचे वास्तुविशारदाचे काम पहात आहेत. श्री. यादगिरी कोंडा यांना आतापर्यंत रु.४,५०,०००/- कामापोटी विद्यापीठाने अदा केलेले आहेत. श्री.यादगिरी कोंडा यांनी देयक विद्यापीठास सादर केले आहे. सदरचे देयक व्यवस्थापन परिषदेच्या अवलोकनार्थ सादर.

**ठराव क्र.१२** **या विषयाबाबत सखोल अभ्यास करण्यासाठी खालील समिती गठीत करण्यात आली व समितीने सखोल अभ्यास करुन अहवाल सादर करावा असे ठरले.**

**१) प्रा. बी .पी. रोंगे - अध्यक्ष.**
**२) डॉ. एल.पी. देशमुख - सदस्य.**
**३) डॉ. पी. जी. मोरे - सदस्य.**
**४) डॉ. एम. एस. शेजूळ - सचिव.**

**विषय क्र. १३** **इलेक्ट्रीकल पॉवर फॅक्टर पॅनेल बसविण्याबाबत.**

टिपणी:- विद्यापीठाकडील विद्युत कामाकरीता असणाऱ्या इलेक्ट्रीकल पॉवर फॅक्टर पॅनेलमध्ये बदल करण्याबाबत दि.१७/११/२००८ रोजी दैनिक सकाळमध्ये निविदा प्रसिध्द करण्यात आली होती. या जाहिरातीस अनुसरुन एकूण ४ फर्मने निविदा भरल्या होत्या. दि.०४/१२/२००८ रोजी सदर निविदा उघडण्यात आल्यानंतर सदर फर्मना वाटाघाटीकरीता बोलाविण्यात आले. वाटाघाटीनंतर मे. एस. बी. इलेक्ट्रीकल्स सोलापूर यांचे दर कमी असल्याचे आढळून आले आहेत. खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता जोडला आहे.

| Sr. No. | Name of Contractor | Amount | After Negotiation |
|---|---|---|---|
| 1) | M/s. Yogeshwari Electricals, Solapur. | 1,42,000/- | Absent |

| | | | |
|---|---|---|---|
| 2) | Shri. Vishal R. Bhattad, Solapur. | 1,58,353/- | 1,56,000/- |
| 3) | M/s. S.B.Electricals, Solapur. | 1,30,000/- | 1,30,000/- |
| 4) | M/s. Rahul Electricals, Solapur. | 1,44,500/- | 1,44,000/- |

उपरोक्त तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन केले असता, मे. एस. बी. इलेक्ट्रीकल्स, सोलापूर यांचे दर तुलनेने कमी असल्याचे दिसून येते. सबब, मे. एस. बी. इलेक्ट्रीकल्स सोलापूर यांना सदरचे काम देण्याबाबत विषय व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.

**ठराव क्र.१३ इलेक्ट्रीकल पॉवर फॅक्टर पॅनेल बसविण्याचे काम मे. एस. बी. इलेक्ट्रीकल्स, सोलापूर यांना देण्यास मान्यता देण्यात आली.**

**विषय क्र. १४ कॉम्प्युटेशनल सायन्स इमारतीमधील किरकोळ स्थापत्य कामाबाबत.**

टिपणी:- सोलापूर विद्यापीठाकडील कॉम्प्युटेशनल सायन्स इमारतीमधील किरकोळ स्थापत्य कामे पूर्ण करण्यासाठी दि.२७/११/२००८ रोजी दैनिक सकाळ मध्ये निविदा प्रसिध्द करण्यात आलेली होती. या कामाची किंमत रु.२,३४,०४५/- इतकी आहे. या जाहिरातीस अनुसरुन ०३ फर्मने निविदा भरल्या होत्या. या तीनही फर्मना वाटाघाटीस बोलाविले होते. वाटाघाटीनंतर खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आला आहे.

| Sr. No. | Name of Contractor | % below/ above rate | After Negotiation |
|---|---|---|---|
| 1) | Shri. Prasad Shete, Solapur. | 12.71% above | 9.71% above |
| 2) | Shri. Suhas Halkude, Solapur. | 18.91% above | 16% above |
| 3) | Shri. Vishal Bhattad, Solapur. | 6.0% above | 5.00% above |

उपरोक्त तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन केले असता, श्री. विशाल भट्टड सोलापूर यांचे दर तुलनेने कमी असल्याचे दिसून येते. सबब, श्री. विशाल भट्टड, सोलापूर यांना सदरचे काम देण्याबाबत विषय व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.

**ठराव क्र.१४ कॉम्प्युटेशनल सायन्स इमारतीमधील किरकोळ स्थापत्य कामे श्री. विशाल भट्टड सोलापूर यांना देण्यास मान्यता देण्यात आली.**

**विषय क्र. १५ प्रत्येक तालुक्यात कला, वाणिज्य व विज्ञान या विद्याशाखेच्या किमान एक अनुदानित महाविद्यालयासाठी शैक्षणिक वर्ष २००९-१० साठी प्राप्त झालेल्या प्रस्तावावर महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळाने केलेल्या शिफारसी व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

**ठराव क्र.१५ प्रत्येक तालुक्यात कला, वाणिज्य व विज्ञान या विद्याशाखेच्या किमान एक अनुदानित महाविद्यालयासाठी शैक्षणिक वर्ष २००९-१० साठी प्राप्त झालेल्या प्रस्तावावर महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळाने केलेल्या शिफारसी खालील दुरुस्त्यांसह व्यवस्थापन परिषदेने मान्य केल्या.**

**१) पान क्र. ५४ वर, क्र. १ बाबत शिफारस "आहे"**
**२) पान क्र. ५५ वर, क्र. १ बाबत शिफारस "आहे"**
**३) पान क्र ५६ वर, क्र. १ बाबत शिफारस "आहे"**
**४) पान क्र. ५७ वर, क्र. ५ बाबत शिफारस "आहे"**
**५) पान क्र. ५८ वर, क्र. १ बाबत शिफारस "आहे"**
**६) पान क्र. ५९ वर, क्र. १ बाबत शिफारस "आहे"**
**७) पान क्र. ६० वर, क्र. २ व ३ बाबत शिफारस "आहे"**
**८) पान क्र. ६१ वर, क्र. १ बाबत शिफारस "आहे"**

**विषय क्र. १६ एम. फिल. व पीएच.डी. अभ्यासक्रमासाठी शुल्क सुधारणेबाबतचा शुल्क समितीने केलेला प्रस्ताव व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ...**

**(सोबत तक्त जोडला आहे)**

(टिपणी: विविध अभ्यासक्रमाचे शुल्क ठरविण्यासाठी विद्यापरिषद व व्यवस्थापन परिषदेने प्राचार्य जे. के. बिले यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित केली होती.

गठित केलेल्या समितीचा कार्यवृत्तांत व शुल्क तक्ता सोबत जोडला आहे. प्रस्तावित शुल्क सन २००८-०९ या शैक्षणिक वर्षापासून लागू करावयाचे असून सदर विषय विद्यापरिषदेच्या दिनांक ११-१२-२००८ रोजीच्या बैठकीत ठराव क्र.४०(११) नुसार मान्य करुन व्यवस्थापन परिषदेस शिफारस केलेला आहे.

सदरचा प्रस्ताव व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर).

**ठराव क्र.१६ एम. फिल. व पीएच.डी. अभ्यासक्रमासाठी शुल्क सुधारणेबाबतचा शुल्क समितीने केलेला प्रस्ताव पुढील सभेत सादर करावा तसेच वरील शुल्क सुधारण्यामध्ये सुस्पष्टता यावी यासाठी सदर शुल्क समितीची पुन्हा एक बैठक घ्यावी व त्यामध्ये प्रा. बी. पी. रोंगे यांना आमंत्रित करावे असे ठरले.**

विषय क्र. १७ शैक्षणिक वर्ष २००९-१० साठी विषयवाढ, तुकडीवाढ व संलग्निकरणाच्या विस्तारासाठी प्राप्त प्रस्तावावर म.व.वि.वि.मं. समितीने दि. १५/१२/२००८ रोजी झालेल्या बैठकीत केलेल्या शिफारसी व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर.

ठराव क्र.१७ शैक्षणिक वर्ष २००९-१० साठी विषयवाढ, तुकडीवाढ व संलग्निकरणाच्या विस्तारासाठी प्राप्त प्रस्तावावर म.व.वि.वि.मं. समितीने दि. १५/१२/२००८ रोजी झालेल्या बैठकीत केलेल्या शिफारसी खालील दुरुस्तीसह मान्य करण्यात आल्या.

१) बी.सी.एस. ऐवजी बी.एस्सी. (एन्टायर कॉम्युटर सायन्स) अशी दुरुस्ती करावी.

विषय क्र. १८ शैक्षणिक वर्ष २००९-१० साठी नवीन महाविद्यालय/ नवीन विद्याशाखेसाठी प्राप्त प्रस्तावावर म.व.वि.वि.मंडळ समितीने दि. १५/१२/२००८ रोजी झालेल्या बैठकीत केलेल्या शिफारसी व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.

ठराव क्र.१८ शैक्षणिक वर्ष २००९-१० साठी नवीन महाविद्यालय/ नवीन विद्याशाखेसाठी प्राप्त प्रस्तावावर म.व.वि.वि.मंडळ समितीने दि. १५/१२/२००८ रोजी झालेल्या बैठकीत केलेल्या शिफारसी खालील दुरुस्त्यांसह मान्य करण्यात आल्या.

१) पान क्र. ७९ वर, क्र. १३ बाबत शिफारस "आहे"
२) पान क्र. ८१ वर, क्र. १३ बाबत शिफारस "आहे"
३) पान क्र. ८२ वर, क्र. ५ बाबत शिफारस "आहे"
४) पान क्र. ८३ वर, क्र. ७ व ८ बाबत शिफारस "आहे"
५) पान क्र. ८७ वर, क्र. २१ बाबत शिफारस "आहे"
६) पान क्र. ८९ वर, क्र. २८ बाबत शिफारस "नाही"
७) पान क्र. १०२ वर, क्र. १ बाबत शिफारस "आहे"
८) पान क्र. १०५ वर, क्र. १ बाबत शिफारस "नाही"
९) पान क्र. १०५ वर, क्र. ४ व ५ बाबत शिफारस "नाही"
१०) पान क्र. ११६ वर, क्र. १२ बाबत शिफारस "नाही"

**मा.कुलगुरु यांच्या परवानगीने येणारे आयत्या वेळेचे विषय :-**

**विषय क्र.१९(१) शिक्षकांच्या अर्जित रजेबाबत याचिका क्र.२६७१/२००६ श्री. रामदास भिला पाटील विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर यावर झालेल्या न्यायालयीन आदेशाबाबतचे मा.शिक्षण संचालक (उ.शि.) पुणे यांचे पत्र व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

टिपणी:- याचिका क्र.२६७१/२००६ श्री. रामदास भिला पाटील विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर या व त्यामधील अवमान याचिका क्र.१९१/२००६ च्या अनुषंगाने शासनाच्या दि.११ एप्रिल, २००७ च्या पत्रान्वये विद्यापीठ व अशासकीय महाविद्यालयातील अधिव्याख्याते हे दीर्घ सुट्टी विभागातील कर्मचारी असल्याने त्यांना अर्जित रजा देय नसल्याचे कळविण्यात आले आहे. त्यामुळे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव यांच्या परिनियम ४२४ (C) अन्वये दीर्घ रजा घेण्याऱ्यांना अर्जित रजेचे लाभ मिळण्याची तरतूद असली तरी ती ग्राह्य धरता येणार नाही. यास अनुसरुन दि.०९ ऑगस्ट, २००७ च्या पत्रान्वये सर्व विद्यापीठांना व उच्च शिक्षण सहसंचालकांना विद्यापीठ व अशासकीय महाविद्यालयातील अधिव्याख्याते हे दीर्घ सुट्टी विभागातले कर्मचारी असल्याने त्यांना अर्जित रजा देय ठरत नाही. त्यामुळे परिनियमात जर अर्जित रजेची तरतूद असेल तर त्यामध्ये विद्यापीठाने पूर्वलक्षीप्रभावाने दुरुस्ती करावी किंवा विद्यापीठाने त्यांच्या निधीतून याबाबतचा खर्च भागवावा असे कळविले आहे.

याबाबत विद्यापीठानी त्यांच्या परिनियमात जर अर्जित रजेची तरतूद असेल तर त्यामध्ये पूर्वलक्षीप्रभावाने दुरुस्ती या आदेशाच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत करावी. अशी दुरुस्ती न केल्यास व भविष्यात याबाबत न्यायालयीन प्रकरण उद्‌भवल्यास व अशा प्रकरणात अर्जित रजेच्या रोखीकरणाची रक्कम अदा करणे भाग पडल्यास, सदर रक्कम विद्यापीठांना देण्यात येणाऱ्या वेतन अनुदानाच्या रकमेतून कापून घेण्यात येईल असेही कळविले आहे. (सोबत पत्र पहावे).

सोलापूर विद्यापीठास सध्या शिवाजी विद्यापीठाचे परिनियम लागू असल्याने अर्जित रजेबाबत विद्यापीठीय व विद्यापीठाशी सलंग्नित असलेल्या महाविद्यालायातील शिक्षकांना शिवाजी विद्यापीठाचे कलम ७३ अन्वये बनवलेले पदव्यूत्तर शिक्षकांचे परिनियम क्रं.२७२ लागू असल्याने त्यात अर्जित रजेची तरतूद आहे. सबब, शासनाचे दि.२०-१०-२००८ रोजीचे पत्र व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.

**ठराव क्र.१९(१) पदव्युत्तर शिक्षकांना शिवाजी विद्यापीठाचा अर्जित रजेबाबतचा परिनियम क्र.२७२ मा. शिक्षण संचालक (उ.शि.) पुणे यांचे पत्रानुसार सोलापूर विद्यापीठास लागू न करण्याचा निर्णय घेण्यात आला.**

**विषय क्र.१९(२) सोलापूर विद्यापीठाने पात्र ठेकेदाराकडून मनुष्यबळ पुरविण्याबाबत.**

टिपणी: सोलापूर विद्यापीठाकरीता ठेकेदाराकडून मनुष्यबळ पुरविण्याकरीता दि.१२/११/२००८ रोजी दैनिक सकाळमध्ये व दि.१२/११/२००८ रोजी दैनिक संचारमध्ये निविदा प्रसिध्द करण्यात आली होती. या जाहिरातीस अनुसरुन एकूण १६ फर्मने निविदा भरल्या. दि.१२/१२/२००८ रोजी दुपारी १ वाजता सदर निविदांची जाहिरातीनुसार कागदपत्रे (दराची बंद लखोटे न उघडता) निविदा उघडून तपासण्यात आल्या. त्या अनुषंगानं सदर तपासणीमध्ये ज्या फर्मनी जाहिराती नुसार कागदपत्रे जोडलेली आहेत त्यानुसार कमिटीने ११ फर्मना पात्र केले आहे; व त्यानुसार छानननी कमिटीच्या निर्णयाअन्वये पात्र फर्मना अंतर्गत कार्यालयीन टिपणी दि.१५/१२/२००८ अन्वये मा.कुलगुरुंच्या मान्यतेनंतर, दि.१९/१२/२००८ रोजी सायंकाळी ४-०० वा. कमिटीसमोर पात्र ठेकेदारांच्या दरांच्या निविदा उघडण्यात आली. तसेच त्याच दिवशी १० पात्र फर्मना वाटाघाटीकरीता बोलाविण्यात आले. वाटाघाटीनंतर आणि निविदेतील दर यांचा तुलनात्मक तक्ता सोबत जोडला आहे. करारपत्राचा नमुना सोबत जोडला आहे.

सबब मनुष्यबळपुरवठा करण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.

**ठराव क्र.१९(२) प्रशासनाच्या वतीने खालील बाबी निदर्शनास आणून देण्यात आल्या.**

**१) ठेकेदाराकडून त्यांना मिळणाऱ्या प्रति व्यक्ती प्रति महिना सर्व्हीस चार्जेसमधून कुशल, अर्धकुशल व अकुशल कर्मचाऱ्यांसाठी अनुक्रमे प्रत्येकी रु.११०/-, रु.१०७/- व रु.१०४/- विद्यापीठाकडून टी.डी.एस. म्हणून कपात करणे अभिप्रेत आहे.**

**२) व्यवस्थापन परिषदेच्या दि.२७/१२/२००७ रोजीच्या सभेतील ठराव क्र.११ नुसार यापुढे मे. प्राईमा ग्रुप सोलापूर या फर्मला काम देऊ नये असे ठरविण्यात आले आहे.**

**वरील बाबींचा विचार करता, खालील मुद्यांची नोंद घेणे गरजेचे आहे.**

**१) श्रीकृष्ण व भंडारी सर्व्हिसेस यांचा देकार कपात होणाऱ्या टी.डी.एस. पेक्षाही कमी असल्यामुळे त्यांचा विचार करणे उचित वाटत नाही.**

**२) व्यवस्थापन परिषदेने मे. प्राईमा ग्रुप सोलापूर याबाबत निर्णय घेतल्यामुळे त्यांच्या देकाराचा विचार करणे गरजेचे नाही.**

**वरील सर्व बाबींचा विचार करुन खालीलप्रमाणे ठरविण्यात आले.**

**१) उर्वरित ठेकेदारापैकी सर्वात कमी देकार असलेले वर्षा (विजग्राहक) सेवा या ठेकेदारास मनुष्यबळ पुरविण्याबाबत प्रथम प्राधान्य देण्यात यावे.**

**२) सदर ठेकेदाराने सेवा देण्यास असमर्थता दर्शविल्यास त्यानंतरचा देकार असलेले रॉयल इंडस्ट्रीयल सर्व्हिसेस, पाटील सेक्युरीटी सर्व्हिसेस यांचा मनुष्यबळ पुरविण्याबाबत क्रमाने विचार करण्यात यावा. करारनाम्यामध्ये योग्य ती दुरुस्ती करण्यास मान्यता देण्यात आली.**

**विषय क्र.१९(३)** **नवीन अंदाजपत्रकीय शिर्षक उघडण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर.**

टिपणी : सोलापूर विद्यापीठाकडे असलेली मालमत्ता (Assets) विक्री केल्यानंतर त्यावर होणारा नफा जमा करण्यासाठी अथवा तोटा खर्ची टाकण्यासाठी सन २००८-०९ च्या अंदाजपत्रकात खालीलप्रमाणे नवीन अंदाजपत्रकीय शिर्षक उघडणे आवश्यक आहे. तरी सदरची बाब व्यवस्थापन परिषदेस विचारार्थ सादर.

| **Maintenance Budget** | | | |
|---|---|---|---|
| **Department इ Registrar** | | | |
| Receipt Side | | Expenditure Side | |
| Budget | Provision | Budget | Provision |
| Surplus on sale of fixed assets | 3,00,000/- | Deficit on sale of fixed assets | 3,00,000/- |

**ठराव क्र.१९(३)** **Surplus & Deficit on sale of fixed assets हे नवीन अंदाजपत्रकीय शिर्षक उघडण्यास मान्यता देण्यात आली.**

**विषय क्र.१९(४)** **चेंजिस इन स्टाफच्या समितीने सादर केलेल्या महाविद्यालयातील शिक्षकांना मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ.**

(सोबत प्रस्ताव जोडला आहे.)

टिपणी: संलग्नित महाविद्यालयाकडील शिक्षकांना चेंजिस इन स्टाफ मान्यता देण्यासाठी Ordinance ०.५९ प्रमाणे गठीत केलेल्या समितीची बैठक दि.२०/११/२००८ रोजी झाली.

या बैठकीमध्ये सोबत जोडलेल्या तक्त्याप्रमाणे चेंजिस इन स्टाफ च्या मान्यतेच्या शिफारशी केलेल्या आहेत. शिफारशींना Ordinance ०.६५ प्रमाणे व्यवस्थापन परिषदेची मान्यता आवश्यक आहे. हा अहवाल व्यवस्थापन परिषदेसाठी विचारार्थ व मान्यतेसाठी सादर.

**ठराव क्र.१९(४)** **चेंजिस इन स्टाफच्या समितीने सादर केलेल्या महाविद्यालयातील शिक्षकांना मान्यता देण्याच्या शिफारशींना मान्यता देण्यात आली.**

**विषय क्र.१९(५) सोलापूर विद्यापीठातील विविध इमारतींसाठी पाणीपुरवठा करणारी पाईपलाईन करुन घेणे व सबमर्सिबल पंप बसविण्याच्या कामास मंजुरीचा विषय व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

(सोबत प्रस्ताव जोडला आहे.)

टिपणी : सोलापूर विद्यापीठाच्या आवारात मुलींचे वसतिगृह इमारत व मल्टीक्लास रुम इमारत पुर्णत्वास येत आहेत. या इमारतींसाठी पाणीपुरवठा करणारी पाईपलाईन करणे व सबमर्सिबल पंप बसविणे अत्यंत जरुरीचे आहे. याबाबत बांधकाम समितीमध्ये रु. २,५०,०००/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी घेण्यात आलेली आहे. आता नवीन बोअरवरुन पाईपलाईन करुन विद्यापीठाच्या आवारातील हौदात पाणी आणून टाकणे सोपे जाणार आहे व नवीन लँग्वेज ॲन्ड लिटरेचर इमारतीसाठी देखील पाणीपुरवठा करणारी पाईपलाईन होणार आहे.

सदरच्या कामास व येणा-या खर्चास मान्यतेचा विषय व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.

**ठराव क्र.१९(५) सोलापूर विद्यापीठातील विविध इमारतींसाठी पाणीपुरवठा करणारी पाईपलाईन करुन घेणे व सबमर्सिबल पंप बसविण्याच्या कामास मान्यता देण्यात आली.**

**विषय क्र.१९(६) परिक्षा विभागाकडील सन २००६ पासून कार्यरत असलेले मे. कोअर इन्फो सोल्यूशन प्रा. लि. कोल्हापूर यांचे सॉफ्टवेअर कराराची मुदत संपल्याने नव्याने (AMC) करार करण्याची बाब मा. व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

टिपणी :परिक्षा विभागाकडे सन २००६ पासून कोअर इन्फो सोल्यूशन्स प्रा. लि. कोल्हापूर या कंपनीची संगणक प्रणाली (Software) कार्यरत असून, सदर कंपनीबरोबरचा करार मार्च/एप्रिल २००८ परिक्षेपर्यंतचाच झालेला आहे. गत तीन वर्षात ही संगणकप्रणाली कार्य करीत असून यामधून येणारे निकालही अचूक लागताहेत. विद्यापीठाने वेळोवेळी कळविल्यानंतर कंपनीने त्यांचे कर्मचारी पाठवून प्रणाली मधील येणाऱ्या त्रुटी दूर केल्या आहेत व विद्यापीठाने सुचविल्याप्रमाणे प्रणाली user friendly केली आहे. सध्या कोअर सॉफ्टवेअर प्रणालीत सर्व अभ्यासक्रमाचे Result Processing होत आहे.

सदर संगणक प्रणालीमध्ये काही तांत्रिक अडचणी आल्यास, तसेच अभ्यासक्रमामध्ये, नियमांमध्ये, अभ्यासक्रम आराखड्यामध्ये बदल झाल्यास सदर बदलाप्रमाणे प्रणालीमध्येही बदल करुन घेणे आवश्यक असते. तसेच CAP साठी लागणारे Software तयार करणे इ. साठी सदर Software कंपनी बरोबर वार्षिक देखभाल करार (AMC) करणे आवश्यक आहे. त्यासाठी कंपनीने देकार पत्र व करार पत्र दिलेले आहे. त्याची छायांकित प्रत सोबत जोडली आहे. व्यवस्थापन परिषद सदस्याच्या विचारार्थ सादर.

**ठराव क्र.१९(६)** **परिक्षा विभागाकडील सन २००६ पासून कार्यरत असलेले मे. कोअर इन्फो सोल्यूशन प्रा. लि. कोल्हापूर यांचे सॉफ्टवेअर कराराची मुदत संपल्याने नव्याने (AMC) करारास खालील दुरुस्त्यांसह मान्यता देण्यात आली.**

**१) AMC साठी मे. कोअर इन्फो सोल्यूशन प्रा. लि. कोल्हापूर यांना रु.८०,०००/- देण्याचे ठरले.**

**२) कोअर इन्फो सोल्यूशन प्रा. लि. कोल्हापूर यांनी दिलेल्या CAP साठीच्या सॉफ्टवेअर चार्जेस रु.२०,०००/- दयावे असे ठरले.**

**३) करारात योग्य त्या दुरुस्त्या करण्यास मान्यता देण्यात आली.**

**विषय क्र.१९(७)** **दलित मित्र कदम गुरुजी महाविद्यालय, मंगळवेढा या ठिकाणी प्राचार्य / प्रभारी प्राचार्य नसल्याने महाविद्यालयाच्या प्रशासकीय कामकाजात येणाऱ्या अडचणीबाबत धोरणात्मक निर्णय घेण्याची बाब विचारार्थ.**

टिपणी : दलित मित्र कदम गुरुजी महाविद्यालय, मंगळवेढा या महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष कदम यांची प्राचार्यपदाची मान्यता विद्यापीठाने दि. १९ सप्टेंबर २००८ च्या पत्रान्वये काढून घेतलेली आहे. तसेच यापुढे प्राचार्य म्हणून डॉ. सुभाष कदम यांचे स्वाक्षरीने कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार न करण्याबाबत संस्थेस १६ ऑक्टोबर २००८ रोजी कळविले आहे.

दिनांक ०३/११/०८ रोजी प्रभारी प्राचार्य पदाचा प्रस्ताव न पाठविलेबाबत विद्यापीठाने संस्थेस कळविले असता उलटपक्षी सदर संस्थेने डॉ. सुभाष कदम हेच रितसर प्राचार्य असल्याचे पत्र विद्यापीठास पाठविलेले आहे. विद्यापीठाने डॉ.सुभाष कदम यांची प्राचार्य पदाची मान्यता काढून घेतलेली आहे. तर संस्था विद्यापीठाचा हा निर्णय मान्य करत नसून डॉ. सुभाष कदम हेच प्राचार्य असल्याचे सांगून त्यांच्याऐवजी इतराची प्रभारी प्राचार्य म्हणून नेमणूक करीत नसल्याने सदर महाविद्यालयाच्या दैनंदीन कामकाजात प्रशासकीय अडचणी येत आहेत. सबब सदर बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.

**ठराव क्र.१९(७)** **१) दलित मित्र कदम गुरुजी विज्ञान महाविद्यालय, मंगळवेढा या महाविद्यालयाच्या बाबतीत प्रशासक नेमण्याची शासनास शिफारस करण्यात आली.**

**२) सध्या तातडीची गरज लक्षात घेता, विद्यार्थ्यांचे पात्रता, परीक्षा अर्ज इ. अनुषंगिक बाबीबाबत प्राचार्य संत दामाजी महाविद्यालय मंगळवेढा यांना काम पाहण्याबाबत सांगण्याचे ठरले.**

**विषय क्र.१९(८)** **विज्ञान महाविद्यालय, सांगोला या महाविद्यालयाचा नैसर्गिक वाढीचा प्रस्ताव व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

टिपणी : विज्ञान महाविद्यालय, सांगोला या महाविद्यालयाने दि.२०-१२-२००८ रोजी बी.सी.ए.भाग-२च्या तिस-या तुकडीसाठी जून २००९ पासून नैसर्गिक वाढीचा प्रस्ताव सादर केलेला आहे. विज्ञान महाविद्यालयाच्या बी.सी.ए.भाग-१च्या तिस-या तुकडीस सप्टेंबर ०८ मध्ये उशिरा मान्यता मिळाली असल्याने सदरचा प्रस्ताव शै.वर्ष.२००९-१० च्या नैसर्गिक वाढीच्या प्रस्तावाच्या यादीत समावेश करण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.

**ठराव क्र.१९(८)** **विज्ञान महाविद्यालय, सांगोला या महाविद्यालयाचा जून २००९ पासून नैसर्गिक वाढीचा प्रस्ताव शैक्षणिक वर्ष २००९-१० च्या नैसर्गिक वाढीच्या प्रस्तावाच्या यादीत समावेश करण्यास मान्यता देण्यात आली.**

**विषय क्र.१९(९)** **तृतीय वर्षातील विद्यार्थ्यांकडून परीक्षा अर्जाबरोबरच पदवीप्रदान अर्ज भरुन घेण्याबाबतचा धोरणात्मक निर्णयासाठी व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

टिपणी:- पदवीप्रदान कार्यक्रम दरवर्षी साधारणपणे डिसेंबर/जानेवारी मध्ये घेतला जातो. निकाल लागल्यानंतर माहे जून ते माहे ऑक्टोबर पर्यंत पदवीप्रदान अर्ज भरण्याची विलंब व अतिविलंब शुल्कासह मुदत असते. तरीही काही विद्यार्थी वेळेत अर्ज भरत नाहीत. वर्षानुवर्षे त्यांची पदवी विद्यापीठाकडे राहते. याबाबत विद्यार्थ्यांनी तृतीय वर्षाचा परीक्षा अर्ज भरतानाच पदवीप्रदान अर्ज त्याचवेळी भरुन घेण्यात यावा याबाबत धोरणात्मक निर्णय होण्यासाठी व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.

**ठराव क्र.१९(९)** **पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमातील अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांकडून परीक्षा अर्ज भरतेवेळीच पदवीप्रदान अर्ज भरुन घेण्याबाबत मान्यता देण्यात आली.**

**विषय क्र.१९(१०)** **सोलापूर विद्यापीठास संलग्नित महाविद्यालयातील आणि विद्यापीठातील शिक्षकांच्या खाजगी शिकवण्या प्रतिबंधित करण्यासाठी भरारी पथक नेमण्याबाबत.**

**ठराव क्र.१९(१०)** **सोलापूर विद्यापीठास संलग्नित महाविद्यालयातील आणि विद्यापीठातील शिक्षकांच्या खाजगी शिकवण्या प्रतिबंधित करण्यासाठी खालीलप्रमाणे भरारी पथक नियुक्त करण्यात आले.**

**१) प्रा. एन. बी. पवार - अध्यक्ष.**
**२) प्राचार्य जे. के. बिले - सदस्य.**
**३) प्रा. बी. पी. रोंगे - सदस्य.**

मा.कुलगुरु यांच्या परवानगीने सभा संपल्याचे मा.कुलसचिव यांनी जाहीर केले.

सही/-
**स.भा.चौधरी**
**व.लिपीक, सभा विभाग**

सही/-
**एम.एस.शेजूळ**
**सचिव, व्यवस्थापन परिषद**

सही/-
**बी. पी. बंडगर**
**अध्यक्ष, व्यवस्थापन परिषद**